3

ई/४५१

# त्रैमासिक

भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे

वर्ष ६३, अंक १, शक १९०६

# Quarterly

of the

Bharata Itihasa Samshodhaka Mandala, Pune

Vol. 63, No. 1, July 1984

भारत इतिहास संशोधक मंडळाच्या त्रैमासिकाचे प्रकाशन नोव्हेंबर १९२० सालापासून सुरू झाले. त्रैमासिक मुख्यत्वेकरून भारताच्या इतिहासासंबंधी निरनिराळ्या भाषांतील मूळ, अस्सल ऐतिहासिक साधने उजेडात आणते. तसेच या इतिहासाच्या विविध अंगांचा अभ्यास करणारे संशोधन लेख प्रकाशित करते.

The Quarterly of the Bharata Itihasa Samshodhaka Mandala was started in November 1920. Since then the Quarterly has been publishing mainly original source-material available in different languages, and also research articles relating to various aspects of Indian history and culture.

# त्रैमासिक

भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे

वर्ष ६३, अंक १, शक १९०६

# Quarterly

of the

Bharata Itihasa Samshodhaka Mandala, Pune

Vol. 63, No. 1, July 1984

ऋणनिर्देश : महाराष्ट्र साहित्य संस्कृति मंडळाकडून या अंकासाठी त्याच्या नियमानुसार अनुदान मिळाले आहे.



वार्षिक वर्गणी – रुपये दहा

* * *



* * *

प्रकाशक : म. श्री. माटे, चिटणीस, भा. इ. सं. मंडळ, १३२१ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

मुद्रक : य. गो. जोशी, आनंद मुद्रणालय, १५२३ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.

## अनुक्रमणिका

## नकाशा

A Map of Nargund and Ramdurg Principalities ( with article by K. N. Chitnis ) ( opp. page 76 )

भा. इ. सं. मं. त्रैमासिक ६३ : १, जुलै १९८४

# मोहेंजोदडो संस्कृतीच्या संदर्भात वैदिक वाङ्मयातील शवाधानांसंबंधीचे उल्लेख

कु. टो. जैतली
पुणे

मोहेंजोदडो, हडप्पा, लोथल, रंगपूर, कालीवंगा, रोपड येथील उत्खननातून सापडलेल्या सामग्रीचे परीक्षण केल्यानंतर ही सर्व स्थळे एकाच संस्कृतीची आहेत, असे निश्चित मत करता येते. ह्यावर पुरातत्त्वज्ञांनी पुष्कळ लिहिले आहे, परंतु एका विषयाकडे त्यांचे विशेष लक्ष गेलेले दिसत नाही, आणि तो विषय म्हणजे मृत देह पुरण्याच्या जागा, कबरी किंवा शवाधाने.

आज निरनिराळ्या देशात जी उत्खनने झाली आहेत, त्यात अनेक ठिकाणी शवाधाने मिळाली आहेत, आणि त्यात जी हत्यारे, मातीची भांडी इत्यादी सामग्री सापडली आहे, त्यावरून त्यांचे परीक्षण करून त्या त्या शवाधानांचा काळ ठरविला जाऊ शकतो.

येथे एका गोष्टीचा उल्लेख करावयास हवा. अनेकदा पुरातत्त्वज्ञ वर्तमानकालीन राष्ट्रांचे नकाशे समोर ठेऊन त्यांचा विषय प्रतिपादन करीत असतात. जसे– " आर्यांनी सिन्ध, पंजाबच्या मूळ निवासी लोकांवर आक्रमण केले " इत्यादी स्वरूपाचे प्रतिपादन. परंतु हा दृष्टिकोन चुकीचा असून हे सगळे हेत्वाभास आहेत. दुसरी गोष्ट अशी की, पाश्चिमात्य विद्वानांची विषय प्रतिपादनाची पद्धत वेगळी आहे. एकमेकांतील भेद पाहाणे ही युरोपीय विद्वानांची खास चिकित्सा पद्धत. त्यामुळे आर्य, असुर, द्रविड आदि भेद करून ते विषय प्रतिपादन करतात. परंतु वैदिक आणि पौराणिक वाङ्मयांत हे सगळे एकच होते असे स्पष्ट उल्लेख आहेत. जसे " देवाश्च असुराश्च उभये प्राजापत्या " म्हणजे देव आणि असुर हे दोघेही प्रजापतीची अपत्ये होत.

पौराणिक वाङ्मयांत– " वैवस्वत मनु पूर्वजन्मात द्रविडेश्वर होता " असा स्पष्ट उल्लेख आहे. जसे–

एकदा कृत मालायां कुर्वतो जलतर्पणम् ।
तस्याञ्जल्युदके काचिच्छफर्येकाऽभिपद्यत ॥ १२ ॥
सत्यव्रतोऽञ्जलिगतां सह तो येन भारत ।
उत्ससर्ज नदीतोये शफरीं द्रविडेश्वरः ॥ १३ ॥

( श्रीमद्भागवत स्कं. ८ अ. २४ )

म्हणजे, कृतमाला नदीवर जलतर्पण करताना **द्रविडेश्वर** सत्यव्रताच्या अंजलीत एक लहान मासा आला आणि त्याने तो परत नदीत टाकला.

पुनश्च—

" योऽसौ सत्यव्रतो नाम राजर्षिर्द्रविडेश्वरः ।
स वै विवस्वतः पुत्रो मनुरासीदितिश्रुतम् ॥ २-३ ॥
( भागवत. स्कं. ९, अ. १ )

अर्थात् – जो द्रविडेश्वर सत्यव्रत होता, तो दुसऱ्या जन्मात वैवस्वत मनु झाला.

ह्या वैवस्वत मनूचा मूळ प्रदेश उत्तरकुरू म्हणजे सध्याचा ' इराक ', जेथे जलप्रलय झाला आणि मत्स्यावतार झाला. ब्रह्मपुराणात म्हटले आहे,

" मत्स्यरूपश्च गोविंदः कुरुष्वास्ते सनातनः ॥" ( १८।५९।५९ )

भागवत पुराणात उत्तरकुरूला रम्यक-वर्ष म्हटले आहे–

" रम्यकेच भगवतः प्रियतमं मात्स्यं अवताररूपं
तद्वर्ष-पुरुषस्य मनोः प्राक् प्रदर्शितम् ॥ " ( भाग. ५।१८।२४ ) असो.

मुद्दा एवढाच की, मोहेंजोदडो, हडप्पा संस्कृती आणि त्यांचा काळ यांचा विचार करताना तत्कालीन मानवी भूगोल समोर ठेवला पाहिजे.

त्यावेळी गुजरात, सिन्ध, राजस्थान आणि पंजाबपासून मेसोपोटामिया, ईजिप्त आणि भूमध्य समुद्रापर्यंत एकाच वैदिक आर्य संस्कृतीचे लोक होते असे, त्या वेळच्या स्मशानांचा अभ्यास करताना आढळते. त्या वेळच्या ह्या भूखंडांत जेवढी शवाधाने सापडली आहेत त्यांचे तीन प्रकार करता येतील :

१. आयत कोणाकार

२. अंडाकार गोल, आणि

३. पेल्यासारखी गोल व खोल. ह्या संबंधात अधिकारी विद्वानांचे मत असे आहे की, अशा तीन प्रकारच्या शवाधानांचा काळ ठरविणे कठीण आहे. ( सिंधु सभ्यता पृ. २१९ ) परंतु, जेव्हा मी ह्यावर विचार केला, तेव्हा मला शतपथ ब्राह्मणाची आठवण झाली. तेथे ह्या तीनही प्रकारच्या शवाधानांचे वर्णन आहे. जसे–

" देवाश्च असुराश्च उभये प्राजापत्याः । ते देवा असुरान् सपत्नान् भ्रातृव्यान् दिग्भ्यः अनुदन्त । ते अदिक्काः पराभवन् । तस्माद् याः दैव्याः प्रजाः **चतुःस्रक्तीनि** ताः श्मशानानि कुर्वते । अथ याः आसुर्यः प्राच्याः त्वद् ये त्वद् **परिमंडलानि** ॥ "

( शत. १३/८/१/पू. )

म्हणजे – प्रजापतीची लेकरे देव आणि असुर ह्या दोघांमध्ये कलह झाला. देवांनी असुरांना सीमेपार हाकलून दिले. त्यामुळे असुर पराभूत होऊन दिशारहित झाले. ह्या कारणामुळे देव स्वतःचे श्मशान चौकोनी करतात, ( कोन = दिशा ). आणि असुर परिमंडल म्हणजे गोल ( दिशारहित ) करतात.

पुढे म्हटले आहे की,

"**अन्तर्धायोहि एके निवपन्ति** । × × × । तस्माद् या दैव्याः प्रजाः **अन्तर्नंहितानिताः श्मशानानि कुर्वते** । अथ याः आसुर्यः प्राच्याः त्वद् ये त्वद् **चम्वां** त्वद् ॥ "

म्हणजे – काही लोक शवाधान खोल करतात. परंतु, देव जास्त खोल करीत नाहीत. प्राच्य असुर पेल्यासारखे गोल शवाधान करतात. ( चमु = पेला ).

प्राचीन इजिप्तमध्ये अविदोस प्रदेशात जर, अहा, नरभर ह्या राजे लोकांची शवाधाने आयताकार चौकोनी आढळली आहेत. ( चाईल्ड, पृ. १०४ ). तेथे जर्जी लोकांची शवाधाने प्रायः लांब आणि कोणाकार मिळाली आहेत. ( चाईल्ड, पृ. ८३-८४ ). नील नदीच्या काठी मदी नावाच्या वसाहतीमध्ये गोल अंडाकार शवाधाने मिळाली आहेत. ( चाईल्ड, पृ. ९३ ). मेसोपोटामियात सुसान्याच्या जवळ तेल अली अबदमध्ये कोणाकार किंवा पेल्याच्या आकाराच्या गोल कबरी सापडल्या आहेत. ( चाईल्ड, पृ. १८० ). भारतात पण हडप्पा, कालीवंगा आणि रोपड आदी स्थळांत चौकोनी आणि गोल आकाराची शवाधाने सापडली आहेत. ( सिं. स. पृ. २१९, गॉर्डन पृ. १९६ ).

अथर्व वेदात चार प्रकारच्या शवसंस्कारांचा उल्लेख आहे—

" ये निखाता, ये परोप्ता, ये दग्धा, ये चोद्धिताः ।
सर्वान् तान् अग्ने आहव पितॄन् हविषे अत्तवे ॥ " ( १८।२।२।३४ )

अर्थात् – जे पृथ्वीचे आत आहेत, जे बाहेर टाकून दिले आहेत, ज्यांचें अग्निसंस्कार झाले आहेत, आणि जे पृथ्वीतून बाहेर काढले आहेत, हे अग्ने ! त्या सर्व पितरांना हवि खायला आण.

अथर्व वेदात कबरींचा पण स्पष्ट उल्लेख आहे—

" उपसर्प मातरं भूमिं एतां उरुव्यचसं पृथिवीं सुवेशाम् । ऊर्णम्रदा पृथिवी दक्षिणावतः एषात्वा पातु प्रपथे पुरस्तात् ॥ " ( अथर्व. १८।३।३।४९ ).

म्हणजे – हे प्रेता ! तू भूमिमातेच्या जवळ ये. हे विशाल आणि सुखकर आहे. याची माती ऊर्णसारखी मऊ आहे. दक्षिणावती आहे. पुढे जायला तुला ते सुखकर होवो.

अशा प्रकारच्या आणखी ऋचा आहेत. शतपथात वर्णन आहे की—

" अथ अनग्निचितः एतदेव भूमिजोषणं समानं ।
कर्म यद् अन्यद् अग्निकर्मणः कुर्यात् अहिताग्नेः ॥ " (शत. १३।८।४।११)

म्हणजे – जो अग्निहोत्री नाही त्याचे भूमीत दफनकर्म केले पाहिजे, आणि जो अग्निहोत्री आहे त्याचे अग्निसंस्कार केले पाहिजेत.

**रथात शव नेणे**

वैदिक काळात शवाला रथात ठेवून स्मशानात नेत असत. अथर्ववेदात त्याचा उल्लेख आहे—

" इदं पूर्वं अपरं नियानं ( रथः ) येनाते पूर्वे पितरः परेताः।
पुरोगवा ये अभिशाची अस्य ते वहन्ति सुकृतामुलोकम् ॥ "
( अथर्व. १८।४।४।४४ )

अर्थात्–हा नियान म्हणजे रथ अगोदरचे आणि सध्याचे प्रेत शरीर घेऊन जातो, याच्या पुढे दोन बैल आहेत. ते तुम्हाला सुखपूर्वक घेऊन जातात.

उर, सूसा आणि खफाजे प्रदेशांत उत्खननातून मिळालेल्या कबरींच्या भिंतीवर शवरथांची चित्रे मिळाली आहेत ( चाईल्ड, पृ. १८६ व फोटो प्लेट २४ )

सर्व शवाधानांतून खाद्य–पेय पदार्थांसाठी मातीची भांडी मिळाली आहेत. ह्याविषयी शतपथात वर्णन आहे—

" अन्नाद्यं एव अस्मा एतत्पुरस्तात्प्रत्यग् दधाति ।
यद्जीवेभ्यो हितं तत् पितृभ्यः ॥ " ( शत. १३।८।१।९ )

अर्थात्–प्रेताचे जवळ अन्न आदी पदार्थ ठेवले जातात. जे जीवितासाठी हितकर आहे, तें प्रेतासाठी पण आहे.

शवाधानात शवाचे मस्तक सामान्यतः उत्तर दिशेला आणि पाय दक्षिण दिशेला असतात. ह्या विषयी शतपथात उल्लेख आहे.

" उत्तरतो वर्षीयः । प्रजा वा उत्तराः ।
प्रजामेव तद् वर्षीयसी करोति ॥ " ( शत. १३।८।१।१९ )

अर्थात्–शवाधान उत्तर दिशेला रुंद केले पाहिजे. कारण प्रेताचे नंतर त्याची प्रजा ( = संतति ) उत्तर ( = पुढे )-त्यामुळे प्रजा वृद्धि पावते.

परंतु काही पुरातत्त्वज्ञांच्या मते – ज्यांनी वैदिक वाङ्मयाचा अभ्यास केला नाही– प्रेताचे जवळ पात्र ठेवण्यासाठीच केवळ शिरोभागाला शवाधाने रुंद केलेली असत. ( सिं. स. पृ. २१४ ) असो.

हडप्पामधील शवाधानात कच्च्या विटांचा चबूतरा बांधून त्यावर शव ठेवून विटांनी तो आच्छादित केला आहे. ह्या संबंधात शतपथात म्हटले आहे—

" अथ त्रयोदश पादमात्राः इष्टिकाः अलक्षणाः कृता भवन्ति। या एव अमू अग्नौ इ इष्टिकाः ता एता यजुषा उपदधाति ॥ " ( शत. १३।८।३।६ )

म्हणजे–यजुष् मंत्रांने जसे अग्नि वेदिकेसाठी, तसे शवाधानात विना चिन्हांची एक–एक पाऊल लांबीची, अशा तेरा विटा ठेवाव्यात.

शव वेदिकेच्या भोवती एक किंवा दोन विटांची परिधी मिळाली आहे. ( सिं. स. पृ. २१४ ) त्यासंबंधी शतपथात म्हटले आहे.

" अथ एनत् परिश्रद्भिः परिश्रयति ॥ ( शत. १३।८।२।२ )

शवाच्या वक्षस्थळावर उंच ठेवलेली एक वीट मिळाली आहे ( सिं. स. पृ. २२२ ). त्या संबंधात शतपथकार म्हणतात :

" तासां एकां मध्ये प्राचीं उपदधाति। स आत्मा ॥ " ( शत. १३।८।३।९ )

म्हणजे – त्यात एक वीट मध्यभागी पूर्वेला ठेवतात. तो आत्मा आहे.

अशा प्रकाराने ह्या संपूर्ण भू भागांत मिळालेल्या शवाधानांच्या प्रत्येक अंगाचे शतपथात स्पष्टीकरण सापडते. परंतु अधिकारी पुरातत्त्वज्ञ विद्वानांनी ह्या विषयाकडे पुरेसे लक्ष दिलेले नाही. असो.

हडप्पामध्ये सत्तावन्न शवाधाने मिळाली आहेत. परंतु, मोहेंजोदडोमध्ये एकही शवाधान मिळाले नाही. मार्शल यांच्या मते त्या वेळी मोहेंजोदडोमध्ये शवदहन संस्कार सर्वसाधारणपणे सर्वत्र होत असावेत. ( सिं. स. पृ. २१३ )

माझ्या विचाराप्रमाणे वर उल्लेखिलेल्या शतपथाच्या आधारावरून ( शत. १३।८।४।११ ) असे वाटते की त्या वेळी तेथे सर्वजण अग्निहोत्री असले पाहिजेत व त्यांच्या शवांना अग्निसंस्कार होत असावेत. परंतु एक विशेष म्हणजे, खड्डयांत अस्थि–कलश मिळाले आहेत. ह्या संबंधात काही पुरातत्त्वज्ञांचे मत असे आहे की, पाणी स्वच्छ करण्यासाठी असे अस्थि–कलश वापरीत असावेत. (सिं. स. पृ. २१३) परंतु, वैदिक वाङ्मयाचा परिचय नसल्यानेच अशा प्रकाराची भलती अनुमाने होऊ शकतात. कारण, शतपथात पृथ्वीच्या आत अस्थि–कलश ठेवण्यासंबंधी स्पष्ट उल्लेख आहेत.

" अथ एनं निवपति । इयं पृथिवी प्रतिष्ठा ।
अस्यां एव एनं एतत् प्रतिष्ठापयति " ॥ ( शत. १३।८।३।२ )

म्हणजे–अस्थिपात्र पृथ्वीच्या आत ठेवले पाहिजे. ही पृथ्वी त्याची प्रतिष्ठा आहे. त्यामुळे हे अस्थिपात्र पृथ्वीच्या आत ठेवतात.

अथर्ववेदात पण अशा प्रकारचे वर्णन आहे–

" इदं कसांबु चयनेन चितं तत्सजाता अवपश्यत इतः ॥ मर्त्योऽयं अमृतत्वमेति, तस्मै गृहान्कुरूत यावत् सबंधुः ॥ ( अथर्व. १८।४।४।३७ )

अर्थात् – हे बांधवांनो ह्या प्रेताची चयन केलेली हाडे पाहा, ह्यावर घर बांधा, आता हा प्राणी अमृतलोकात जाईल.

ह्या विस्तृत वर्णनाने हे स्पष्ट करावयाचे आहे की भारताच्या पश्चिम आणि वायव्य सीमेपासून प्राचीन मेसोपोटामिया, ईजिप्त आणि भूमध्य समुद्रापर्यंत शवाधान संस्कार शतपथ आणि अथर्ववेदातील वर्णनाप्रमाणे सर्वत्र सारखे होते. ह्यात काडीमात्र संशय नाही.

**शवाधानात कुत्रा :**

आणखी एक महत्त्वाची गोष्ट ही की, रोपड यथील उत्खननात एका शिवाधानात मानवाच्या अवशेषाखाली कुत्र्याचे अवशेष सापडले आहेत. ( सिं. स.–पृ. २१७ ) अशा प्रकारची शवाधाने प्राचीन ईजिप्त आणि मेसोपोटामियात पुष्कळ मळाली आहेत ( चाईल्ड पृ. ७०, १५१ ) ह्या विषयी अधिकारी पुरातत्त्वज्ञ फक्त

एवढेच सांगून मोकळे होतात की, कुत्रा त्याच्या मालकाचा लाडका पाळीव प्राणी असावा, त्यामुळे, त्याचे मालकासह दफन केले गेले असेल.

परंतु, वस्तुस्थिती वेगळी आहे. ज्याने वैदिक वाङ्मय आणि वर उल्लेखिलेल्या शवाधानांच्या संस्कृतीचा तुलनात्मक अभ्यास केला असेल, तो सांगू शकेल की, कुत्रा हा यम लोकाचा द्वारपाल आहे, त्यामुळे ह्याचे मानवासह दफन केले आहे. आजतागायत सर्वसाधारण हिंदू श्राद्धक्रियेत

" द्वौ श्वानौ श्याम-शबलौ वैवस्वतकुलोद्भवौ ।
ताभ्यां बलिं प्रदास्यामि स्यातां मे ता वहिरूकौ " ॥

हा श्लोक उच्चारून एक पिंड कुत्र्यासाठी देतात. ऋग्वेद ( १०।१४।११ ), अथर्ववेदात ( १८।२।२।१२ ) पण अशा प्रकारची ऋचा आहे–

" यौ ते श्वानौ यमरक्षितारौ चतुरक्षौ पथिपदी नृचक्षसा ।
ताभ्यां राजन् ! परिधेह्येनं स्वस्त्यस्मा अनमीवंच धेहि ॥ "

अर्थात्– हे राजन् ( पितृस्वामिन् ) यमपुरीची रक्षा करणारे ज्यांचे चार नेत्र आहेत, जे पितृलोकाच्या मार्गात बसले आहेत, जे मानवाचे सर्व प्रकारचे कर्म पाहतात, ते तुमचे दोन कुत्रे प्रेताच्या रक्षणासाठी द्या, आणि ह्या प्रेताला लोकांत राहायला बाधारहित स्थान द्या.

पारशी लोकांत पण स्मशान–विहिरीत प्रेत जाईपर्यंत त्याच्या समोर नेहमीचा कुत्रा आणून उभा करतात. त्यास " सग दीद " म्हणतात. ( Persia-past and present pp. 338–9 ).

प्राचीन ग्रीक संस्कृतीमध्ये पण अशा प्रकारची समजूत होती की, कुत्रा यमलोकाचा द्वारपाल आहे. असो.

मोहेंजोदडो मध्ये सापडलेल्या मुद्रांत दोन मुद्रा महत्त्वाच्या आहेत. एका मुद्रेत ( मार्शल–पृ. ३८२ ) तीन ग्रीवेचा पशु आहे. मुद्रेवर " |||||| Ψ " अशा प्रकाराचा लेख आहे. त्याचे मी " ससक " असे वाचन करतो. ही स्पष्टच पार्शी लोकांच्या ' सग दीद ' संबंधी मुद्रा आहे. दुसऱ्या मुद्रेत ( मार्शल–पृ. ३८३ ) अनेक ग्रीवेचा सर्प आहे. ह्या दोन्ही मुद्रा यमलोकाच्या द्वारपालांच्या आहेत. असो.

**चांदीची नाव :**

प्राचीन ईजिप्त आणि मेसोपोटामियाच्या पुष्कळ शवाधानात चांदीच्या किंवा साध्या नौका सापडल्या आहेत. ( चाईल्ड, पृ. १९०, आणि फोटो प्लेट–२४. ) ह्या संबंधात अधिकारी पुरातत्त्वज्ञ विद्वानांनी काहीच खुलासा केला नाही. परंतु, आर्य संस्कृतीत गोदान, शय्यादान आदींच्या प्रभावाने जीवात्मा एका नौकेत बसून सुखपूर्वक वैतरणा नदी ओलांडून स्वर्गात जातो, अशा प्रकारची समजूत आहे. हीराकोनपोलिसमध्ये फेराओ शासन कालातील एका शवाधानाच्या भितीवर वैतरणाचे

चित्र मिळाले आहे. ( चाईल्ड पृ. १०१ ) हे युद्धाचे चित्र आहे असा श्री व्ही. गार्डन चाईल्ड यांचा अभिप्राय आहे. परंतु, चित्रात असलेली नावे सिंह आणि शस्त्रधारी हे सगळे आर्य संस्कृतीप्रमाणे वैतरणा नदीचीच आठवण करून देतात.

वर मी लिहिले आहे की गुजरात, सिन्ध राजस्थान आणि पंजाबपासून प्राचीन ईजिप्त, मेसोपोटामिया आणि भूमध्य समुद्रापर्यंत, किरकोळ प्रान्तभेद सोडले तर एकाच आर्य वैदिक संस्कृतीचे लोक राहत होते. ह्या संबंधी काही दाखले वर दिले आहेत. शिवाय, आणखी एक प्रमाण देता येईल.

प्राचीन ईजिप्तची पिरामिड, म्हणजे शवाधाने, प्रसिद्ध आहेत. त्यामुळे येथे त्यांचे वर्णन करण्याची जरूर नाही. परतु वैदिक वाङ्मयात ह्यासंबंधी काही माहिती आली आहे का ? फक्त येवढ्यापुरता खुलासा मी येथे करू इच्छितो.

शतपथात मृताच्या स्मारकासाठी दोन प्रकार वर्णिले आहेत.

" गृहान् वा प्रज्ञानं वा " ( शत. १३।८।१।१ )

अर्थात्- घरासारखी समाधी ( पिरामिड, चैत्य, लेणे इ. ) करणे किंवा छत्री, चबूतरा, स्तूप करणे.

गृह- समाधीचा खुलासा करताना तेथे म्हटले आहे की-

" गुहा सदवतापि स्यात् ॥ ११ ॥ चित्रं पश्चात्स्यात् । प्रजा वै चित्रम् । चित्रं हास्य प्रजा भवति ॥ १२ ॥ यदि चित्रं न स्यात् आपः पश्चाद् उत्तरे वा स्युः । आप एव हि चित्रम् । चित्रं ह एवास्य प्रजा भवति ॥ १३ ॥ "

म्हणजे- शवासाठी गुहा सुखकर आणि चित्रांनी सज्ज असली पाहिजे. किंवा नदीच्या काठावर असली पाहिजे. त्यामुळे संतान चित्रासारखे होतात ( वृद्धि पावतात )

हे वर्णन पिरामिडच्या रचनेशी तंतोतंत जुळते. बाबीलोनियाच्या प्रदेशात एक शवाधान कालव्याच्या जवळ पण मिळाले आहे ( चाईल्ड, पृ. १८८ )

अथर्ववेदात पण मृत व्यक्तीच्या आठवणीसाठी गृह बनविण्याचा उल्लेख आहे.

" यथा यमाय हर्म्यं अवपन् पंचमानवाः ॥
एवं वपामि हर्म्यं यथा मे भूरयोऽसता ॥ " ( अथर्व. १८।४।४।५५ )

अर्थात्- जसे पंचमानवाने यमाकरिता हर्म्य बनविले होते, तसे, मी त्या प्राण्यासाठी हर्म्य निर्माण करतो, ज्यामुळे माझ्या बंधु-बांधवांची वृद्धि होवो.

पिरामिडमधील शव ( ममी ) सहस्रो वर्षे सुरक्षित आहेत. त्यासाठी मसाले, औषधे इ. ची माहिती त्या लोकांना असणारच. परंतु, वैदिक वाङ्मयातही त्याचे वर्णन आहे. आश्वलायन श्रौत सूत्रात लिहिले आहे :

" प्रेतालंकारान् कुर्वन्ति । केश-श्मश्रु-लोम-नखानि वापयन्ति । नलदेन अनुलिंपन्ति । नलदमालां प्रतिमुञ्चन्ति । तिष्पूरिषं कृत्वा पृषद् आज्यं पूरयन्ति ॥ ( ६।१०।१ )

म्हणजे- केश-श्मश्रु-लोम-नखे काढून, आंत्रभागात राहिलेला मल काढून,

तूप–लोणी भरून नलद ओषधीने शवावर लेप करावा.

शेवटी, थोडक्यात एका गोष्टीचे स्पष्टीकरण करून हा विषय संपवितो. मोहेंजोदडो आणि हडप्पा इत्यादी ठिकाणच्या लिपि आणि भाषेचा पन्नास वर्षांहून जास्त काळ मी सतत अभ्यास करीत आलो आहे. सुमारे चारशे मुद्रांचे सार्थ वाचन केले आहे. त्यांत न्नन्न, प्पओ, व्वअ, स्सक अशी समानरूप द्वित्व व्यंजने मला पुष्कळ आढळली आहेत. नंतर श्री स्टेन कोनो यांचे " शक स्टडी " हे पुस्तक मी वाचले. तेथे पण अश्शोक, ग्गंगा, त्तिमिर, मुद्दित असे शब्द आढळले. तेव्हा छात्रावस्थेत कंठस्थ केलेले माध्यंदिनी शुक्ल यजुस्चे मंत्र स्मरण होऊ लागले. कारण, तेथे पण व्वसिह, सप्प्त, धन्न्वा अशी समान द्वित्व व्यंजने आढळतात. अशा प्रकाराने त्या वेळची लिपि आणि भाषेचा अभ्यास करताना मोहेंजोदडो आदीची पैशाची प्राकृतभाषा ( म्हणजे– शक भाषा ) होती, असे माझे मत झाले आहे. शिवाय शवाधान संस्कृति आणि वैदिक वाङ्मय यांच्या तुलनात्मक अभ्यासाने मी निश्चितपणे सांगू शकतो की ह्या संस्कृतीचा, शतपथ, अथर्ववेद तसेच शुक्ल यजुस् यांच्याशी जवळचा संबंध आहे. लोकमान्य श्री बाळ गंगाधर टिळक यांनी '**ओरायन**' मध्ये आणि श्री शंकर बाळकृष्ण दीक्षित यांनी '**भारतीय ज्योतिष**' मध्ये कृत्तिका वसंत संपातचा गणिताने येणारा शतपथचा काळ कमीत कमी तीन सहस्र वर्षे ख्रिस्तपूर्व असा ठरविला आहे. एक विशेष गोष्ट ही की, शतपथात " पारीक्षितो जनमेजयः " अशा प्रकाराने महाभारतकालीन व्यक्तींचे उल्लेख येतात. परंतु, मोहेंजोदडो आणि हडप्पा येथील मुद्रांचे वाचन करताना मला महाभारत कालीन व्यक्तींचा उल्लेख आढळला नाही. तथापि, मघवा, त्वाष्ट्र, पूषा, भग, वरूण आदी वैदिक कालीन दैवते आणि सुश्रव, वरशिख, भेदनृप आदी लोकांची नावे मिळाली आहेत. त्यामुळे मोहेंजोदडो, आणि हडप्पा आदी संस्कृतींचा काल शतपथाहून अगोदर म्हणजे– ख्रि. पू. तीन हजार वर्षांहून अगोदर, असे निश्चयाने म्हणता येते.

■ ■

## References to burial places in Vedic literature

Summary

A number of ancient burial places have been excavated at different places in a region extending from north–western India upto and including West Asia. From their shapes, the way the dead bodies were buried therein, and other contents etc., the entire region appears to have been inhabited by a people having a common culture.

There are a number of descriptions and other references

in Vedic literature to different types of burial places, which apply fittingly to the ones now excavated. A researcher, therefore, cannot afford to ignore them, while studying the burial places and the ancient culture of the people of this region.

---

## संदर्भ


( १ ) ऋग्वेद – संहिता
( २ ) यजुर्वेद – संहिता
( ३ ) अथर्ववेद – संहिता
( ४ ) शतपथ – ब्राह्मण
( ५ ) आश्वलायनश्रौतसूत्र
( ६ ) किरणकुमार थपल्याल आणि संकटा प्रसाद शुक्ल, सिंधु सभ्यता, लखनऊ : उत्तरप्रदेश हिंदी ग्रंथ अकादमी, १९७६.
( ७ ) राधाकृष्ण चौधरी, प्राचीनतम प्राच्यसभ्यतापर नया प्रकाश, पटना : बिहार हिंदी ग्रंथ अकादमी, १९७० ( मूळ लेखक व्ही. गार्डन चाईल्ड, न्यू लाईट ऑन द मोस्ट एन्सियंट ईस्ट )
( ८ ) वीरेन्द्रकुमार सिन्हा, भारतीय संस्कृती की प्रागैतिहासिक पृष्ठभूमी, पटना : बिहार हिंदी ग्रंथ अकादमी संमेलन भवन, १९७० ( मूळ लेखक : डी. एच. गॉर्डन, प्री हिस्टॉरिक बॅक ग्राऊंड ऑफ इंडियन कल्चर )
( ९ ) ए. व्ही. विलियम्स जॅक्सन, पर्सिया, पास्ट अँड प्रेजेंट, न्यू यॉर्क, १९०४.


■ ■ ■

भा. इ. सं. मं. त्रैमासिक ६३ : १, जुलै १९८४

# आद्य गणिती श्रीधराचार्य

**गो. प्र. जोशी**
गुलबर्गा

**श्रीधराची त्रिशतिका**— द्वितीय आर्यभट्टाच्या महासिद्धांत या गणित ग्रंथातून उपयुक्त प्रकरणे निवडून व आणखी काही उपयुक्त प्रकरणे जोडून भास्कराचार्यांनी लीलावती हा सिद्धांत शिरोमणीचा पहिला भाग लिहिला : "भास्कराचार्येण श्रीधर रचित त्रिशतिकापद्धतेर्द्वितीय आर्यभट्ट विरचित महासिद्धांतोक्त पद्धतेश्च समन्वयं कृत्वा पाटीगणितस्य सिद्धांत शिरोमणौ प्रथम एवाध्याये संग्रहेविहितः ।" ( लीलावती ग्रंथ परिचयः पृ. ३ आनंदाश्रम प्रत ) असे असता सूर्यदाय नावाच्या लीलावतीचा टीकाकार "भास्कराचार्येण अस्य ( श्रीधरस्य ) अनेके प्रकाराः तत् तस्करवत् अपहृताः" असा चोरीचा आळ घेतो. तरी पण या संबंधी लीलावतीच्या इतर टीकाकारांनी श्रीधराचार्यांच्या त्रिशतिका या गणित ग्रंथातून व इतर गणितींच्या ग्रंथातून "मधुकरवृत्या भास्कराचार्येण स्वग्रंथेऽनुष्टितः" असेच म्हटले आहे. यावरून श्रीधराचार्य हे ज्ञात आद्य पाटीगणिती असावेत असे दिसते.

वर त्रिशंतिकेचा उल्लेख केला आहे. त्याबद्दल दोन शब्द लिहिणे उचित होईल. श्रीधराने 'पाटीगणित' नावाचा विस्तृत ग्रंथ लिहिला. पुढे व्यवहारात उपयोगी पडावी म्हणून पाटीगणितातूनच विषय निवडून तीनशे श्लोकांच्या संग्रहाची एक पुस्तिका तयार केली. तिचेच त्रिशतिका हे नाव प्रचारात आले. ( "श्रीधरेण तु पाटी विषयक विस्तृत ग्रंथोविरचितो यत् स्वविरचित पाटी गणितस्य सारमुद्धत्य त्रिशतिकारूपेण लोकव्यवहारार्थं तस्य संक्षेपरूपेण विरचनमावश्यकमभूत संक्षेपरूपेण सारमुद्धृत्य लिखितवान् ग्रंथः त्रिशतिका इति लोके विश्रुतः" ( त्रिशतिका अ. १, लीलावती पृ. ३ ). त्रिशतिकेत अभिन्नगणना, भागाहार, वर्ग, वर्गमूळ, घन, घनमूळ, समच्छेद रूप, भाग, जाती, त्रैराशिक इत्यादी तीस विषयांची चर्चा आढळते. तसेच बीजगणिताचे लेखकही श्रीधराचार्यच असावेत असे दिसते. कारण, द्वि अवयव समीकरणाचे कल्पक श्रीधराचार्य होत असे सर्व गणितींचे मत आहे. त्रिशतिकेचे एक वैशिष्टय म्हणजे हा ग्रंथ श्लोकबद्ध आहे.

असे हे विस्तृत पाटीगणिताचे लेखक श्रीधराचार्य कोण, कोठले व त्यांचा काल कोणता याबद्दल सांगण्यापूर्वी पं. नेमिचंद्र व श्री. श्रीकांत शास्त्री या दोन

लेखकांच्या मतांचा सारांश देऊन मग माझ्या मताकडे वळतो.

बलदेव मिश्र यांचा श्रीधराचार्यांवर एक प्रबंध प्रसिद्ध झाला होता. त्यात श्रीधराचार्य हे उत्तर हिंदचे रहिवाशी असून जैनेतर होते असे म्हटले आहे. याबद्दल पं. नेमिचंद्रजींचे म्हणणे असे की काशी विद्यापीठातून त्रिशतिकेची जी प्रत उपलब्ध झाली त्यातील मंगलाचरणाची सुरुवात—

' नत्वा शिवं स्वविरचित पाट्या गणितस्य सार मुद्धृत्य। लोक व्यवहाराय प्रवक्षति श्रीधराचार्यः ' या श्लोकानी केली आहे. त्याच काळात, म्हणजे इ. स. १९४७ च्या सुमारास, भारतीय ज्ञानपीठाच्या कर्नाटकातील मुडबिद्री शाखेतील शास्त्रागारातून भूर्जपत्रांवर लिहिलेली एक पंचेचाळिस पानी त्रिशतिकेची प्रत सापडली. तिची लिपी कानडी, भाषा संस्कृत असून मंगलाचरणाची सुरुवात—

' नत्वाजिनंस्वविरचित पाट्यागणितस्य सारमुद्धृत्य।
लोक व्यवहाराय प्रवक्षति श्रीधराचार्यः॥ ' अशी केलेली आढळते.

या ठिकाणी मंगलाचरणाची सुरुवात ' नत्वाजिनं ' ने झाली आहे. यावरून लेखक जैन असावेत असे मत पं. नेमिचंद्रजींचे झाले; व आपल्या मताच्या पुष्टयर्थ " नत्वा जिनं " हेच बरोबर असून ' नत्वा शिवं ' असा जो काशी विद्यापीठ प्रतीत बदल आढळतो तो मागाहून कोणा शिवभक्त गणितीने केला असावा असे त्यांनी प्रतिपादन केले. कारण त्यांच्या मते ज्योतिष, आयुर्वेद, गणित हे जैन पंथीयांना जितके प्रिय आहेत, तितकेच शिवभक्तांना पण प्रिय आहेत. यात कोणत्याही पंथाच्या आड येण्यासारखे काही नाही. म्हणून मुडबिद्री येथील त्रिशतिकेच्या प्रतीत " नत्वाजिनं " ने सुरुवात केलेला मंगलाचरणाचा श्लोकच बरोबर आहे, व म्हणून त्रिशतिकेचे लेखक श्रीधराचार्य हे जैन होत. हा झाला त्यांचा पहिला मुद्दा.

आता श्रीधराचार्य हे कोठले ?

पं. बलदेव मिश्र तथा सुधाकर द्विवेदी यांच्या मते श्रीधराचार्य हे उत्तर हिंदचे रहिवाशी होत. पण पं. नेमिचंद्र यांना ते मान्य नाही. त्यांच्या मते श्रीधराचार्य हे दक्षिण हिंदचे, त्यातल्या त्यात कर्नाटकीय ठरतात. आपल्या मताच्या पुष्टयर्थ श्रीधराचार्य लिखित ग्रंथातील एक श्लोक ते उद्धृत करतात :

उत्तरतोहिमनिलयं दक्षिण तो यावत्। प्राक् परो दधिमध्ये नोगणकः श्रीधराचार्यः।

यावरून श्रीधराचार्य यांचे मूळस्थान कृष्णा गोदावरीच्या प्रदेशामधील एक ग्राम होय.

तिसरा प्रश्न त्यांच्या कालाबद्दल. पंडितजींचे मत असे की ज्योतिष शास्त्रातील मास धरूवा पद्धतीने श्रीधराचार्य यांनी शके ७२० च्या सुमारास ज्योतिर्ज्ञान विधि हा ग्रंथ लिहिला असे सिद्ध होते. म्हणून श्रीधराचार्य यांचा काल ८ वे शतक असावा असे पंडितजींचे मत होय.

आता, ' The date of Sridharacharya ' या पं. श्रीकांत शास्त्री यांच्या

लेखाकडे वळू. मुडबिद्री येथे मिळालेल्या पंचेचाळीस पानी त्रिशतिकेच्या प्रतीची लिपी कन्नड व भाषा संस्कृत असून तिचे लेखक श्रीधराचार्य होत. शास्त्रीजी लिहितात : " Sridharacharya has composed jyotijnanvidhi in the latitude of 16°–38 ' somewhere in between Belgaum and Hyderabad, somewhere in Kalyan region of that period " ( जैन सिद्धान्त भास्कर भाग ९४ करण २ )

पं. नेमिचंद्र शास्त्री तसेच श्रीकांत शास्त्री यांच्या मताचा मागोवा घेतला तर श्रीधराचार्य हे जैन असून त्यांचे वस्तीग्राम कर्नाटक असून त्यांची याबद्दल एकवाक्यता आढळते. पण कालाबद्दल त्यांच्यात मतभिन्नता आढळते. श्रीकांत शास्त्रींच्या मते श्रीधराचार्य हे जैन असून हे एक महामंडळेश्वराचे दण्डाधिकारी व कर्णाधिप असून त्यांचा काल इ. स. १०४९ म्हणजे सोमेश्वर १ ला याचा काल; व पंडित नेमिचंद्रजींच्या मते ८ वे शतक पहिले दशक. दोघा पंडितांच्या मतात दोन अडीचशे वर्षांची अशी तफावत आढळते.

आता माझे विचार मांडतो. श्रीधराचार्य हे शैव शांडिल्य गोत्री, भास्कराचार्य यांचे ज्ञात पूर्वज होत हे नलचंपूच्या ताम्रपटाच्या आधारे दाखविण्याचा माझा प्रयत्न राहील.

नलचंपू काव्याचा लेखक शांडिल्य गोत्री त्रिविक्रमभट्ट. हा मळखेड येथे राष्ट्रकूट राजा कृष्ण दुसरा ( इ. स. ८७०–९१४ ) व इंद्र तिसरा ( ९१४–९२९ ) याच्या दरबारी राजपंडित होता. त्रिविक्रम भट याचे वडील देवादित्य यांना कृष्ण दुसरा याचा मळखेड येथे राजाश्रय होता. म्हणून त्रिविक्रम भट्ट व त्यांचे वडील मळखेड परिसरातील होत.

नलचम्पू काव्यात नळदरबाराचे जे वर्णन आढळते, ते वर्णन मळखेड येथील इंद्र तिसरा याच्या दरबाराचे वर्णन होय. खड्गपूर्णा, कुंडनीपूर, भार्गवाश्रम ही सर्व स्थाने गोदावरी नदीच्या काठावर पाथरीच्या आसपास वसलेली आहेत. कुंडनीपूर ( पृ. ११९ ) भार्गवाश्रम ( पृ. १२२ ) यांचे सूक्ष्म वर्णन त्रिविक्रम ज्या अर्थी करतो त्या अर्थी याचा काही काळ पाथरी परिसरात गेला असावा. विशेषतः पूर्णेच्या वर्णनावरून त्रिविक्रमचा काही काळ तेथे गेला असावा असे वाचकाचे मत होते.

शांडिल्यगोत्री त्रिविक्रमभट्ट आपला पिता देवादित्य व आजा श्रीधर यांचा उल्लेख नलचम्पूत करतो :

" तेषां वंशे विशद यससां श्रीधरस्यात्मजोऽभूत ।।
देवादित्या स्वमति विकसत वेदविद्या विवेकः ।।
उत्कल्लोलां दिशि दिशि जनाः कीर्ति पीयूष सिंधु ।।
यस्याद्यापि श्रवण पुटकैः कूणिताक्षाः पिवन्ति ।। १९ ।।

तैस्तैरात्म गुणैर्येन त्रिलोक्यस्तिलकायितुं ॥
तस्मादस्मिं सुतो जातो जाडय पात्रं त्रिविक्रमः ॥ २० ॥
( नल चम्पू १ ला उल्हास श्लोक १९, २० )

शांडिल्य गोत्री त्रिविक्रम भट्ट गणिती भास्कराचार्यांचे ज्ञातपूर्वज होत असे डॉ. भाऊ दाजी यांनी नासिक येथे मिळालेल्या ताम्रपटाच्या आधारे सिद्ध केले आहे.

त्या ताम्रपटातील श्लोक असे—

शांडिल्य वंशे कवि चक्रवर्ती । **त्रिविक्रमो**ऽभूत नयोनु जातः ॥
यो भोज राजेन कृताभिधानो । विद्यापति भास्कर भट्ट नामा ॥ १६ ॥
तस्माद गोविंद सर्वज्ञो जातो गोविंद सन्निभः ।
प्रभाकर सुतस्तस्मात् जातः प्रभाकरः इवापरः ॥ १७ ॥
तस्माद् मनोरथो जातः सतांपूर्ण मनोरथः ।
श्रीमान्महेश्वराचार्यस्ततो कवीश्वरः ॥ १८ ॥
तत्सूनुः कविवृंद वन्दितपदः सद्वेद विद्यालता ।
कन्द कंस रिपु प्रसादित पदः सर्वज्ञविद्यासदा ॥
यच्छिष्यै सह कोऽपि नो विवदितुं दक्षो विवादी क्वचित ।
श्रीमान् भास्कर कोविदः समभवत् सत्कीर्ति पुण्यान्वितः ॥ १९ ॥
लक्ष्मी धराख्योऽखिल सूरि मुख्यो वेदार्थ वित्तार्किक चक्रवर्ती ॥
ऋतुक्रिया कांड विचार सारो विशारदो भास्कर नंदनोऽभूत ॥ २० ॥
सर्वशास्त्रार्थ दक्षोऽयम इतिमत्वा पुरादतः ॥
जैत्रपाळेन योनीतः कृतश्च विबुधाग्रणी ॥ २१ ॥
तस्मात् सुतः सिंहण चक्रवर्ती । दैवज्ञ वर्योऽजन चंगदेवः ।
श्री भास्कराचार्य निबद्धशास्त्रं । विस्तारहेतोः कुरुते मतंयः ॥ २२ ॥
भास्कर रचित ग्रंथाः सिद्धांत शिरोमणि प्रमुखाः ।
तद् वंश कृताश्चान्ये व्याख्येया मनमठे नियतम् ।
सोयिदेवेन मठाय दत्तं हेमादि वा किंचिदिहा परैश्च ।
भूम्यादि सर्वे परिपालनीयं भविष्य भूपः र्वहुपुण्य वृद्धयै ॥ २४ ॥
( एपि. ग्रा. इंडि. भाग १ पृ. ३४१ नलचंपू काव्य पृ. ४ वरून )

नासिक येथे मिळालेल्या वरील ताम्रपटातील श्लोकाच्या साहाय्याने भास्कराचार्य यांचे ज्ञात पूर्वज शांडिल्य गोत्री त्रिविक्रम भट्ट होत असे सिद्ध केले आहे. परंतु नलचम्पूचा लेखक शांडिल्य गोत्री त्रिविक्रम भट्ट आपला पिता देवादित्य व आजा श्रीधराचार्य होत असे नलचम्पू काव्यात नमूद करतो. त्यावरून भास्कराचार्य यांचे ज्ञातपूर्वज श्रीधराचार्य ठरतात. श्रीधर→देवादित्य→त्रिविक्रम→भास्कर→गोविंद→प्रभाकर→मनोरथ→महेश्वराचार्य→भास्कराचार्य→लक्ष्मीधर→चांगदेव.

त्रिविक्रम भट्ट व त्याचे वडील देवादित्य मळखेडच्या राष्ट्रकूट घराण्यातील

कृष्ण दुसरा ( ८७०-९१४ ) पुढे त्याचा नातू ( ९१४-९२९ ) यांच्या दरबारी पंडित म्हणून नावरूपास आले व त्याच काळात, इ. स. ९०० च्या सुमारास, नलचंपू काव्य लिहिले गेले.

" इंद्र राज का विस्तृत वर्णन इतिहास के विविध ग्रंथों में उपलब्ध है। इंद्रराज तृतीय ने अपने पटबंधोत्सव के उपलक्ष्य में अनेकविध दान दिये थे। उस संबंध में जो प्रशस्तियाँ लिखी गई उनके लेखक देवादित्य पुत्र त्रिविक्रम भट थे। गुजरात से जो इस संबंध में दो अभिलेख प्राप्त हुए हैं और हालही में महाराष्ट्र से भी एक अभिलेख मिला है उनके अंतमें निम्न श्लोक अंकित है "

श्री त्रिविक्रम भट्टेन देवादित्यस्य सूनुना ॥<br>
कृता शस्ता प्रशस्तैषामिंद्र राजाध्रिसेविना ॥<br>
( एरणीताम्रपट पोहनेरकर संपादित )<br>
" तयाकृत गोवर्धनोद्धार हेलो न्मूलित मेरुणा ।<br>
उपेन्द्र इंद्र राजेन जित्वा येन न विस्मितम ॥

( Jr. of the Bombay Branch of the Royal Asiatic Society 1918, P. 253 )

यावरून त्रिविक्रम भट्ट हे इंद्रराज यांच्या दरबारी होते असे सिद्ध होते व त्याचा काल पण आपणास जाणवतो. नलचम्पू काव्य ९०० च्या सुमारास त्रिविक्रम भट्टाने लिहिले यात काही संशय नाही.

त्रिविक्रमाच्या आज्याचा म्हणजे श्रीधराचार्य यांचा काळ दोन पिढ्या म्हणजे ७५ वर्षे मागे नेल्यास श्रीधराचार्य यांचा काळ आठव्या शतकाचा उत्तरार्ध तथा ९ व्या शतकाचा पूर्वार्ध म्हणजे इ. स. ८२५ पर्यंत समजण्यास काही हरकत नाही.

आता महत्त्वाचा प्रश्न म्हणजे शांडिल्य गोत्री श्रीधराचार्य हेच त्रिशतिकेचे व पाटीगणिताचे लेखक होत का? याला होकारार्थी उत्तर देणे भाग आहे.

शामराव मराठे यांनी आपल्या " द्रुतगणित वेद " या गणितविषयक पुस्तकात प्राचीन तथा मध्ययुगात भारतात होऊन गेलेल्या ३७ गणितींची नावे दिली आहेत. त्यात श्रीधर, त्रिविक्रम, भास्कर, गोविंद, प्रभाकर, महेश्वर, भास्कर, मनोरथ, वराह मिहिर, आर्यभट्ट, सोमेश्वर, परमेश्वर विजयनंदी, अनंतदेव, लक्ष्मीधर इत्यादी गणितींची यादी मिळते. ( 'द्रुतगणित' वेद, पृ. ४१ ) वरील यादीत भास्कराचार्यांच्या वंशातील बहुतेक गणिती म्हणून आढळतात. त्यात श्रीधराचार्य यांचे नाव आहे. ते पण भास्कराचार्यांचे पूर्वज होत.

श्रीधराचार्यांनी विस्तृत पाटीगणित लिहिले. त्या पाटीगणितातून त्रिशतिका लिहिली. त्याचेच दुसरे नाव 'गणित सार' होय. पुढे काही वर्षांनंतर इ. स. ८५० च्या सुमारास अमोघवर्षाचे गुरु गणिती महावीराचार्यांनी गणित सारसंग्रह तयार केला. त्या ग्रंथातील मंगलाचरण श्लोकात महावीराचार्यांनी अमोघवर्षाची

स्तुती केली आहे :

प्रीणितः प्राणि सस्वौघोनिरीतिर्निरवग्रहः ॥
श्रीमतामोघवर्षेण येन स्वेष्टहितैषिणः ॥ ३ ॥
विध्वस्तैकान्त पक्षस्य स्याद्वादन्यायवादिनः ॥
देवस्य नृपतुंगस्य वर्धतां तस्य शासनं ॥ ८ ॥

( गणित सार संग्रह महावीराचार्य श्लोक ३; ८, जै. संवर्धक मं. सोलापूर )

यावरून गणित सार संग्रहकर्ते महावीराचार्यांचा काळ साधारणपणे ९ व्या शतकातील मध्यकाल होय. तसेच प्रसिद्ध गणिती शंकर बाळकृष्ण यांच्या मते " श्रीधरो महावीरतोऽपि प्राचीनः " यावरून महावीरापेक्षा पाचपन्नास वर्षे श्रीधर प्राचीन असावा.

श्रीधराचार्य हे नलचम्पूकार शांडिल्य गोत्री त्रिविक्रम भट्टाचे आजे सिद्ध झाल्यावर श्रीधराचार्य शैव का जैन हा प्रश्न आपोआपच मिटतो. कारण श्रीधराचार्य यांचे नातू त्रिविक्रम भट्टाने नलचम्पूच्या प्रत्येक उल्हासाच्या शेवटी शिवाला तर आळविले आहेच तसेच मी कोठला हे श्लेषाने सुचविले आहे :

हरचरण सरोज द्वंद मुद्रांक मौलेर्मदन ।
मदनिवासा वासरः प्रावृषेण्यः ॥

' माझा वास वासरचा. हा गाव नांदेड जिल्ह्यातील गोदा व मांजरा या संगमावर आहे. त्रिविक्रम भट्ट वासरचे; श्रीधराचार्य हे त्यांचे आजे; श्रीधराचार्य यांचे राहणे पण वासरचे, असा संयुक्तिक तर्क केल्यास काही चूक नाही. " Trivikram bhat the author of Nala Champu who lived in the early years of the tenth century was a staunch follower of Saiva faith. The concluding verse of each chapter contains praise expressive of devotee to Siva. ( Yashastilaka Champu and Indian Culture by K. K. Handigni, p. 233. )

वासर–वासर : ( जि. नांदेड ) जवळ बिज्जळ गाव वसले आहे. असेच बिज्जळवाडी पण देगलूर तालुक्यात व विजूर पण बासरजवळच आहेत. बिज्जळ हा गाव बासरजवळ आहे. एका हाकेवर बीडम् वस्ती आहे. दोन्हीचा समन्वय होऊन बिज्जळ बीडम् झाले आहे. हेच बिज्जळ बीडम प्रसिद्ध गणिती भास्कराचार्य यांचे जन्मग्राम आहे. याच गावाच्या आसपास सह्य कुलाचे फाटे पसरले आहेत. जवळच गोदावरी नदी आहे ( गोदावर्या नातिदूरं बिज्जळबीडम् । ) पूर्वी मोगलकाळी बिज्जळबीडम् बीदर भागात मोडत असे. या ठिकाणी शांडिल्य गोत्री ब्राह्मण घराणी आजतागाईत वस्ती करून आहेत. त्याच परिसरातून पाटीगणिताची पोथी सापडली आहे. त्याची झेरॉक्सप्रत " अनुबंध " मासिकाच्या दप्तरी आहे.

मुडबिद्री प्रतीत " नत्वाजिनं " मंगलाचरणाचा श्लोक आळविणारे श्रीधराचार्य

जैन होते. हे श्रीधराचार्य कन्नड लिपी, भाषा संस्कृतमध्ये मूळ शांडिल्य गोत्री श्रीधराचार्यांच्या त्रिशतिकेची नक्कल करणारे ठरतात. त्यांचा काल इ. स. १०४९ चा होय. श्रीकांतशास्त्री यांनी श्रीधराचार्य यांचा काल ठरविला तो इ. स. १०४९ चा. धरणी गिरी, निधि शकाब्दं विरोधि वत्सर मार्गशीर्ष शुक्लेतरा चतुर्थि (धरणी– १; गिरी = ७; निधि = ९ अंकानां वामतोगति श. ९७१ म्हणजे सन १०४९ हा सन होईल). हे श्रीधराचार्य एका मंडळेश्वराचे दण्डनायक व कर्णाधिप होते. (The date of Sridharacharya by Srikant Shastri.) हा काल कल्याण चालुक्य सोमेश्वर १ ला याचा होय.

त्याच काळातील एका शिलालेखात

५ श्रीधरो : श्री धरो जातो

६ पतिः भूषणं कठकर्णानांजगतो यद् गुणावलिः

जाजस्त लोम....

७ नाथोयथार्थ नामा द्विजदेव भक्तः ब्रह्मशर्मा चमूपतिः

अर्थात्–श्रीधर सेनापति होता पुढे तो चालुक्यनृपाधीश झाला असे म्हटले आहे.

मल्लिकार्जुन भूपतेः अमात्यः झाल्याचे शिलालेख सिद्ध करतो. (विक्रमादित्य याचा मुलगा मल्लिकार्जुन बापाच्या वृद्धावस्थेत इ. स. ११२३ मध्ये वारला).

या सर्वांपेक्षा "निवासा वासरः" हा उल्लेख महत्त्वाचा आहे. ऐतिहासिक चंपूकाव्याचा उल्लेख लक्षात घेतल्यास श्रीधराचार्य शैव, तसेच त्यांचे वस्ती स्थान वासर असण्याची शक्यता डावलता येत नाही. गोदा व मांजरा संगमावरी सरस्वती मंदिरात श्रीधराचार्यांचा उल्लेख असलेला शिलालेख आहे. श्रीधर हे आठव्या शतकातील व त्यांचे पाटीगणित तथा त्रिशतिका उर्फ गणितसार हे त्याच कालातील व वस्तीस्थान वासरपरिसर होय.

## बिज्जलबीड

श्रीधराचार्य यांचे वंशज भास्कराचार्य हे इ. स. १११४ साली बिज्जलबीड येथे जन्मले. हे बिज्जलबीड पाटणजवळ असावे असे भाऊ दाजी यांनी नासिकजवळ सापडलेल्या ताम्रपटाच्या आधारे तथा पाटण येथील पाटणा देवीच्यालगत असलेल्या चांगदेव मठातील शिलालेखाच्या साह्याने दाखवून दिले आहे. बिज्जळबीड पाटण-जवळ होते असे विधान ज्ञानकोश विज्ञान खंड ५ मध्ये आहे. त्या थोर विद्वानांना नतमस्तक होऊन मला असे सुचवावयाचे आहे की भास्कराचार्यांचे जन्मग्राम वासर-जवळच आसपास चारपाच मैलांवर बिजूर, बिज्जळवाडी व बिज्जळबीडम ही गावे आजही अस्तित्वात आहेत. कारण चालुक्य सोमेश्वर १ ला याच्या नांदेडकडील स्वारीत पहिला बिज्जल (इ. स. १०५०) हजर असावा, हाही हैहय वंशातला दुसऱ्या बिज्जलाचा (११४०–११६७) पूर्वज ठरतो, असे हरसूर (ता. गुलबर्गा)

शिलालेखावरून सिद्ध होते :

तद्वंश संभवो भ्रूभद् उचितं तस्य चानुजः ।।
महान् राजो महावीर्यो सौभद्र कुलभूषणः ।।
तद्वंशे असग भूपती समभवत् प्रोद प्रदोविक्रमः ।।
तदंवंशार्णण मध्यतः समद्धात् नीराजयजाव्हयः ।।
बिज्जक्षोणिपती ततश्चनृपतिः भ्राजिष्णु मौलिस्फुरन् ।।
माणिक्यांशु गुणारुणांध्रि युगतः प्रौढप्रतापोदयः ।।
( हरसूर शिलालेख, सं. डॉ. पी. वी. देसाई )

हरसूरशिलालेख व इटगी ताम्रपट यांच्या साह्याने हैहय वंश असाः
उचित → असग → कन्नम → पेरम → बिज्जळ → कृष्ण → जोगम → पेरमादी → बिज्जळ ( इटगी ताम्रपट R. S. Panchmukhi Vol II, Karnataka Research Institute Dharwad )

आता बिज्जळ बीडबद्दल विचार करू. बीडू हा शब्द कन्नड असून त्याचा अर्थ तळ वा मुक्काम वा वस्ती असा होतो. मंगलीशबीडू=मंगलीशाचा तळ म्हणजे आजचे मंगळवेढे झाले आहे. तसेच बिज्जलबीड – पहिला बिज्ज क्षोणीपतिःचा मुक्काम आपल्या सैन्यासह पडला ते ठिकाण बिज्जळवाडी, बिजूर, बिज्जळबीड ही गावे अस्तित्वात आली आहेत. ही सर्व १०४० ते १०७५ च्या सुमारास अस्तित्वात आली हे Inscription of Nanded District ( ed. by Dr. Shelke & Dr. Ritti ) वरून सिद्ध होते. त्या एका बिज्जलबीडमध्ये भास्कराचार्य यांचा इ. स. १११४ साली जन्म झाला.

पहिल्या बिज्जळाची साथ सोमेश्वर याला मिळाली व बिज्जळवाडी, बिजूर, बिज्जळबीडम अशा तीन चार वस्त्या अस्तित्वात आल्या. अशा तऱ्हेचे एकही बीड पाटणजवळ नाही ही ध्यानात घेण्यासारखी गोष्ट आहे. पाटणजवळील अस्तित्वात नसलेल्या बिज्जळबीडास इतिहासाचा दाखला मिळत नाही, म्हणून मुनिश्वराच्या लीलावतीच्या टीकेतील 'गोदावर्यानातीदूरे' बिज्जळबीडमच आताचे नांदेड जिल्ह्यातील सरहद्दीवरील बिज्जळबीड होय.

■ ■

## An Early Indian Mathematician- Shridharacharya

Summary

Shridhara wrote an extensive mathematical treatise entitled *Pāti-ganita*. He later prepared its abridged version for common use, containing 300 verses, after which the work

came to be called *Tri-shatikā*. According to scholars like Nemichanda and Shrikanta, Shridhara was a Jain and came from Karnataka. There are however, two opinions on his period – according to the one he belonged to the early part of the eighth century, and according to the other, the second quarter of the eleventh century.

According to the author, Shridharacharya was a Shaiva of *Shāndilya gotra* and belonged to the first quarter of the ninth century. This opinion is based on the evidence available in Trivikrambhatt's poetic work called *Nala-champu*, written about 900 A. D.

The author also suggests a new identification of the location of Bijjalabid–not near Pātan as earlier supposed, but near Bāsar. Bhāskarāchārya, another great mathematician, the author of ' Lilavati ' and a descendant of Shridharacharya, is known to have been born at Bijjalabid in 1114 A. D.

■ ■ ■

भा. इ. सं. मं. त्रैमासिक ६३ : १, जुलै १९८४

# एकनाथांचा ' पिंगा ' आणि दशावतार

हे. वि. दीक्षित
पुणे

श्रीरंग, पांडुरंग अथवा विठ्ठलु हा विष्णूचा, कृष्णाचा अवतार म्हणून मराठी-भाषी संत व सामान्य जन त्यास भजतात. साहजिकच मराठी वैष्णव संतांच्या दशावतार किंवा अनेक अवतार याबद्दलच्या काय कल्पना आहेत याबद्दलचा शोध घेणे क्रमप्राप्तच होय.

ज्ञानेश्वर हे मराठी वारकरी संप्रदायाचे प्रणेते समजले जातात. तथापि त्यांच्या संकल्पना या एकनाथांच्या आगळ्या संकल्पनेप्रमाणे मनाला चटका लावू शकत नाहीत. ज्ञानेश्वरांच्या संकल्पनांकडे आपण पुढे पाहू.

नाथांनी दशावतारांसंबंधी भारूडे, रूपके या माध्यमातून व पौराणिक कथांच्या आधारे अनेक कवने रचिली आहेत. वाङ्मयकृतीत समाजजीवनाच्या पडलेल्या प्रतिबिंबाची आणि वाङ्मयकृतीच्या समाज जीवनावर पडलेल्या प्रभावाची दाद द्यावी लागते, तसेच अध्यात्मदृष्टीने परामर्श घ्यावा लागतो. कलाकृतीत याचे पडसाद उठतात. विठ्ठलु मूर्ती व संतांचे रूपवर्णनात्मक अभंग यांच्यात अजिबात मेळ नाही. या निबंधात नाथांच्या दशावतार कवनांचा समाज जीवनावर पडलेल्या प्रभावाचा व समाज जीवनाच्या त्यातील प्रतिबिंबाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

समाज व समाजजीवन म्हटले की नाथांच्या समकालाचा राजकीय आढावा-अस्मानी सुलतानी-घ्यावयास पाहिजे, तो इतरांनी ( भावे, पेंडसे, शं. ना. जोशी यांनी ) तसाच नाथांनीही घेतला आहे. म्हणून यथे घेतलेला नाही. नाथांची दशावतार कवने ही सर्वसामान्य जनांना ( व उच्चवर्णीयांना ) उद्देशून रचिली गेली आहेत. एकनाथ हे म्हणून ' लोकसाहित्यकार ' ठरतात.

दशावतार म्हणजे विष्णूचे दहाच अवतार असतात असे नाही. वैष्णवांच्या सात्वतसंहितेत ३९ अवतार आहेत. विष्णूचे दहाच अवतार ही संकल्पना सुमारे १० व्या शतकाअखेर दृढ झाली असावी. त्यानंतर मुसलमानांनी हिंदुस्थान व्याप्त करण्यास प्रारंभ केला. हिंदुस्थानच्या धार्मिक-बहुतांशी हिंदू-जीवनाची उलथापालथ झाली. बौद्धधर्म परागंदा झाला. बिहारात तुर्कांनी नालंदा व विक्रमशीला ही बौद्ध

विश्वविद्यालये नष्ट केली. नाथपंथीयांनी पण त्यांना हातभार दिला. तथापि सामान्य जन तथागत गौतम, त्याचे तत्त्वज्ञान व त्याच्या समाज संस्था सुधारणा यांना विसरले नाहीत. एकनाथही विसरले नाहीत. सामान्यजन जरी वैदिक देवोपासना करीत असले, तरी त्यांना शिवशंभू, भैरव, महालक्ष्मी, यल्लम्मा, शीतला, दुर्गा, काली हीच देवदैवते-जी क्षुद्र दैवते समजली जातात-अधिकतर पसंत होती व आजही आहेत. दशावताराच्या कथामाध्यमातून, एकनाथ बहुजनांना या क्षुद्र देवता-उपासनेपासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करताना दिसतात आणि श्रीरंग पांडुरंग तथाकथित विष्णु-अवतार याच्या भजनी लागा असे सांगतात. हा विठ्ठलूही पूर्वीची क्षुद्रदेवताच.

**नाथांच्या दशावतार कवनांचे—**

(अ) पौराणिक कथा-आधारित, आणि

(आ) भारूडे, रूपके यांचे माध्यम असलेले

असे दोन विभाग केले आहेत.

पौराणिक दशावतार कवनांत मत्स्य, कूर्म, वराह, नरसिंह, वामन, भार्गव परशुराम, दाशरथी राम, वासुदेव कृष्ण व कल्की असे दहा अवतार आढळतात. प्रत्येक अवताराने कार्य उरकल्यावर पुंडलिकासाठी पंढरपुरी पांडुरंगाने विटेवर थारा घेतला हे सूत्र असते. उदा. द्वापारी अवतार आठवा। कंसासूर वधियला। श्रीकृष्ण साठवा। तोचि महाराज चंद्रभागे तरी। उभा राहिलासे कर देऊनि कटी॥ बुद्धावतार हा नववा असतो. नववा अवतार बुद्धरूपी विठ्ठलु असेही आहे. या संदर्भात एक मराठी-संस्कृत असे काहीसे धेडगुजरी कवन आहे. उदा. "द्वापारी कलह कलहयंते। शिशुपाळ वक्रदंत कंसंते.... यात "विश्व बोधंरूपेणंते" असा बुद्धाचा उल्लेख आहे.

पौराणिक आधार घेतल्याने येथे एकांत बुद्धावतार नाही. "बलराम संकर्षण" पण नाही. बहुधा कृष्ण व बलराम हे द्वैत फार पूर्वीच संपून कृष्णावतारातच बलराम विलीन झाला. म्हणून नाथांनी बलराम अवतार सांगितला नाही. तथापि तमिळ अळवारानी बलराम हा अवतार मानून तशी कवने केली आहेत. त्यांच्या रचनेत बुद्ध नाही. तमिळनाडूत शेतीमुळे सुबत्ता असल्याने हलधर बलराम अवतार समजला जात असावा. मीन अवतारात शंखासुराला मारून वेद तारले. तथापि श्वेताश्वतर उपनिषदात (६.१८,१९) रुद्र-शिवाने चारी वेद आणिले असा उल्लेख आहे.

एका पौराणिक आधारभूत दशावतारात "लोक देखोनी उन्मत्त दारा धनीं आसक्त। न बोले बौद्धरूप ठेविले जघनी हात" अशी नाथ माहिती देतात.

येथे विठ्ठलु हा बौद्धरूप आहे. तथागत शाक्यमुनींनी त्यांच्या भिक्षूंनी काही प्रश्न विचारले असता ते प्रश्न अनुत्तरीय आहेत असे म्हटले, म्हणून बुद्धाने मौन

स्वीकारिले. ( ज्ञानेश्वरांच्या पसायदानातील एका ओवीची आठवण होते " आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं इये । दृष्टादृष्ट विजये । होआवें जी ॥ " १८-१८०० )

विठ्ठल हा काही मीन, कूर्मासारखा अवतार नाही. अवतार म्हणूनही विठ्ठलाने काही अवतारकार्य केल्याचे माहीत नाही. विठ्ठलरूपाने बुद्ध पंढरपुरात मौनव्रत घेऊन अठ्ठावीस युगे विटेवर उभा आहे. नामदेवांनी एक सुंदर अभंग रचिला आहे. त्यात ते म्हणतात, " विठ्ठल कानडी जाणतो आणि पुंडलिकाला कानडी येत नाही; तेव्हा अठ्ठावीस युगे ते एकमेकांच्या तोंडाकडे पाहत उभे आहेत. तसेच " भक्ताचिया काजा बौद्ध अवतार जाला दिगंबर अवनिये ॥ "

आणि " नववे अवतारी आपण बौद्धरूप झाला। धरोनिया मौन भक्तावरी राहिला ॥ "........असे अभंग आढळतात.

ज्ञानदेवांनी भगवद्गीता, अ. ९ वा, श्लोक ३३ चे स्पष्टीकरण करताना " मियां लक्ष्मी डावलोनी केली परौती । फेडोनि कौस्तुभ घेतला हाती । मग वोढविली वक्षस्थळाची वाखती । चरणरजां ॥ " असे म्हटले आहे.

भागवत पुराणात कथेत ऋषीने लाथ मारली म्हणून लक्ष्मी रागावते व विष्णू लक्ष्मीचा त्याग करतो असे सांगितले आहे.

तर भविष्य पुराणात दुर्वास ऋषींनी कृष्णाला शाप दिला म्हणून लक्ष्मीचा वियोग झाला असे म्हटले आहे.

वरील मिथ्यकथांत एकवाक्यता नाही. तेव्हा या कथेची उसनवार बुद्ध-चरित्राची आहे. कारण शाक्यमुनीने सर्वांचा त्याग केला. नामदेवांच्या वरील उक्ती-वरून माझ्या म्हणण्याला दुजोरा मिळतो.

पौराणिक कथानकाव्यतिरिक्त नाथांनी आपल्या दशावतार काव्याचे आलंबन समाजातील निम्नस्तरीय जाती, उपजाती व कष्टकरी यांना उद्देशून केले आहे. उदा. महालक्ष्मी, मरीआई, यल्लम्मा, गोंधळ, वैदीण, वैदू इत्यादी; व शेवटी एकनाथांचा " पिंगा. " या प्रत्येकात बुद्धावतार आहेच.

**महालक्ष्मी :**

मच्छाई बया दार उघड । .... कृष्णाई बया दार उघड । बोधाई बया दार उघड । .... बया दार उघड उदो उदो उदो ऐसा शब्द गाजतो .... ॥ बौद्ध अवतार घेऊन । विटे समचरण ठेवून । पुंडलीक दिवटा पाहून । तयाचे द्वारी गोंधळ मांडिला । बया दार लाव ॥

आषाढी कार्तिकी गोंधळ मांडिला

**मरीआई :**

मच्छे कच्छे वराहे नारसिंह वामने परशरामे रामे कृष्णे बौध्ये कलंकिये....

**यल्लमा :**

अविनाश पंढरी जाण। अंबेने पाहिले दिंडिरवन। भक्त पुंडलिका कारण। समचरण करी ठेवून। दृष्टि नासाग्री ठेवून। न्याहाळिती भक्तजन। बौद्धरूप अंबा जाण ॥

बोधोनि सकळाहि लोकां बोधे नेले त्रिविधताप वो...

**गोंधळ :**

एकचि माऊली दहा अवतार खेळली वो....

या गोंधळात नाथ एक ऐतिहासिक सत्य न कळत सांगतात ते असे :

धर्म लोपला अधर्म जाहला हे तूं न पाहसी।
यालागीं बौद्धरूपे पंढरी नांदसी ॥

निम्नस्तरीय जनांना उद्देशून केलेल्या कवनांत सातत्याने बुद्धावतार आहे. एवढेच नव्हे तर, विठ्ठल हाच बुद्ध हे एकनाथ सांगतात. याचे कारण काय असावे? हिंदुस्थानात हिंदु, बौद्ध, व जैन धर्म यांचा इतिहास पाहता हिंदुधर्मांतर्गत पुढील संघर्ष लक्षात येतात :

( १ ) शैव – वैष्णव
( २ ) शैव – जैन
( ३ ) वैष्णव – बौद्ध
( ४ ) नाथसंप्रदाय – बौद्ध
( ५ ) बौद्ध महायान – बौद्ध हीनयान
( ६ ) महानुभाव – वारकरी
( ७ ) वारकरी – वीरशैव

या संघर्षांमुळे भारताच्या एकात्मतेला मोठा धक्का बसला. ज्ञानेश्वरीत ज्ञानेश्वर अहिंसेचा महिमा गातात, तर जैन-बौद्धांच्या अहिंसेची टवाळी करतात. ही पार्श्वभूमी लक्षात घेता एकनाथ दशावतारातून बुद्ध का वगळीत नाहीत हा प्रश्न उभा राहतो. नानक रूपकही विचार करण्यासारखे आहे. गुरु नानक संप्रदाय लक्षात घेऊन ते रचिले गेले का? नानकपंथीय मराठवाड्यात त्यावेळी होते का?

तेरे नगरीमें नानक आया। पैसा टक्का कुच मंगता नही है ॥३९॥ भक्ती रोटी भावका सालन ( ? )। देने मेरेकू सच्चा है ॥४०॥ एका जनार्दनी शाही हमारा। नानक उनका बंदा है ॥४१॥

पद्मपुराणात एक कथा आहे. त्यात गद्‌गद स्वराने पुंडलिक कृष्णाला प्रार्थना करतो.

" ज्ञानविज्ञानहीनानां मूढानां पापिनामपि।
दर्शनात् ते भवेन्मोक्षः। प्रार्थयामि पुनःपुनः ॥ "

पुंडलिक सद्धर्माची इच्छा प्रदर्शित करीत आहे.

अशीच कथा महायानपंथीय बौद्धांच्या 'सद्धर्म पुंडरीक' सूत्रात आहे. सद्धर्म-धर्मपर्याय गौतम सांगतो. स. पुं. सूत्रात गद्‌गद्‌स्वर नावाचे एक परिवर्त आहे.

गद्गद्स्वर हा बोधिसत्त्व महासत्त्व असतो. त्याला गौतम धर्मपर्याय म्हणजे सद्धर्म पुंडरीक ( सत्यधर्मकमल ) सांगतो.

पद्मपुराणात याच सद्धर्म पुंडरीक सूत्राची उचल केली असावी. एवढेच की पुंडरीक पुंडलीक होतो. ( गद्गद्स्वर ). याचा अर्थ कधी काळी आजचे पंढरपूर बुद्धक्षेत्र होते व आजचा पांडुरंग तेव्हा बुद्ध होता. लेण्याद्रि लेण्यातील बुद्ध गणेश होतो तसा.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या एका व्याख्यानात पंढरपूरचा विठ्ठल हा मूळचा गौतम बुद्ध होता असे सांगितले होते.

नाथांनी " पिंगा " नावाची दोन भारूडे रचिली आहेत. त्यांपैकी पहिले असे आहे.

" पिंगा बाई पिंगा गे । अवघा धांगडधिंगा गे ॥ १ ॥
सांडोनी संतांची गोडी गे । कासया पिंगा जोडी गे ॥ २ ।
नको घालूं पिंगा गे । तुम्ही रामरंगीं रंगा गे ॥ ३ ॥
एका जनार्दनी पिंगा ग । काया वाचा गुरुचरणी रंगा गे ॥ ४ ।

गाथेत या भारुडाचा समावेश खेळ या विभागात केला जातो, मुली खेळताना पिंगा घालतात म्हणून. तथापि " कासया पिंगा जोडी गे ? " या प्रश्नांवरून व " तुम्ही रामरंगी रंगा गे " या उपदेशावरून " पिंगा " हा एक क्षुद्र देव वा क्षुद्र देवता असावी. ज्याअर्थी " गे " संबोधन आहे त्याअर्थी स्त्रिया ' पिंगा ' या देवतेची उपासना त्या काळात करीत असाव्यात. आजही मंगळागौरी उपासनेत पिंगा हा घातला जातोच.

शब्दकोशात " पिंग = म्हैस, रेडा, हरिद्रा ( हळद ); पिंगा = एक प्रकारची देवता ( ? ); पिंगपासून पिंगदृश = शिव; पिंगाक्ष = अग्नि, शिव, राक्षस, कुलदैवत; पिगाश = असंस्कृत जनांचा ( Tribe ) नेता; असे अर्थ दिलेले आहेत. ' पिंगा ' या संज्ञेचा संबंध प्रमुखत्वे हळद आणि पांढरी वा काळी मोहरी यांशी आहे. भारतात देवी-उपासनेचा संबंध वृक्षवल्लरी व बहुप्रसवत्वाशी ( Fertility ) आहे. राजस्थानात गौरीची भूदेवी म्हणून बायका पूजा करतात. गौरी - गौर म्हणजे श्वेत, पिवळा रंग, पिकलेल्या धान्याचा रंग पिवळट असतो ( पांडुरंग ). बायका गौरीभोवती नाचतात ( पिंगा घालतात ) पुरुषांना मज्जाव असतो ( नवरात्र वगैरे सण ). काही ठिकाणी मोहरी घरात पिकवून पूजा करतात. हे सर्व सण श्रावणात साजरे केले जातात. आंध्र देशात हळकुंडाची मंगळागौर म्हणून नवविवाहित पूजा करतात. तेथेही पिंगा घातला जातो. महाराष्ट्रात हळकुंडाची पूजा करीत नाहीत असे समजते, हे खरे काय ? आदिवासी हळकुंडाला पवित्र समजतात व स्वयंपाकात त्याचा वापर करीत नाहीत. हिंदु लोकांत जन्मल्यापासून अंत्यविधीपर्यंत हळकुंडाचा वापर केला जातो. तसेच पिवळ्या रंगाला बहुजन-समाजात पवित्र मानले जाते. हरिद्रा आणि

पिवळा रंग यांचा अन्योन्य संबंध आहे. लोकसाहित्यात हळद आणि पिवळा रंग याविषयी कितीतरी गाणी, उखाणे सापडतात. पिंगा म्हणजे हळद, मिरी व मोहरी. मीठ – मोहरीने सांजसमयी – कातरवेळी–दृष्ट काढतात. नाथांचे आणखी एक "पिंगा" भारूड आहे. नाथांपूर्वी लोकसाहित्यात पिंगा, मिरी, हळद, मोहरी, काशी, शिव, व म्हैस यांचा निर्देश सापडतो. त्याची अनेक उदाहरणे देता येतील. पण प्रस्तुत छोट्या लेखात ती स्थलसंकोचास्तव दिलेली नाहीत.

गर्भरक्षक, पतीला आयुष्य देणारी, मुलाबाळांना राक्षसांपासून वाचविणारी हरिद्रा, मीठमोहरी या देवतांचे मूळ अथर्ववेदाच्या ८ व्या कांडात सापडते. 'पिंग' याला पर्यायी नाव 'बज' आहे. बज म्हणजेच पिंग काय ? गर्भिणी स्त्रीच्या ८ व्या महिन्यात 'सीमन्त' कर्मकांडात बज–सर्षप यांचा उल्लेख आढळतो. पिंग/बज ही देवता झाली आहे. याची उदाहरणे पुढीलप्रमाणे देता येतील.

८–६–७ : हे गर्भिणी ! स्वप्नांतरी भावाच्या, पित्याच्या, हिजड्याच्या ( क्लीव रूपान् स्तिरीटन : ) .... अथवा इतर गुप्त रूपाने तुझ्यापाशी येऊन तुला त्रास देणाऱ्या दुष्टांचा बज नाश करो.

८–६–१० : हे जे गाढवासारखे ओरडणारे, घराच्या सभोवती नाचणारे ककुभ इत्यादी अर्जुनवृक्षवत.... राक्षसांचा, हे ओषधे तुझ्या वासाने नाश कर.

८–६–२० : हे गर्भिणी ! गर्भरक्षक मंतरलेले दोन प्रकारचे पिंग, तू ओटीत बांधून सांभाळ, त्यांचा अवमान करू नकोस.

८–६–२१ : हे गर्भिणी ! पवीनस, तंगल्व इत्यादी रोगकारक पिशाच्चापासून अबाधित होण्यासाठी तसेच पतिप्रेम आणि सुप्रजाप्रीत्यर्थ तू मंतरलेला पिंग गळयात धारण कर.

आता प्रस्तुत लेखकाच्या दृष्टीने एकनाथांचे दशावतारात्मक भारूड जे "पिंगा" त्यातील महत्त्वाचे चरण असे आहेत

"निराकाराचा आकार झाला । त्यातच माझा पिंगा जन्मला ।।
निराकारासी घेऊन आला ।। १ ।। माझा पिंगा घालितो धिंगा ।। ध्रु.
पिंग्यापासून शंकर झाला । ढवळ्या नंदीवर बसून आला ।
माझ्या पिंग्याने धक्का दिला ।। माझा पिंगा.... "

यापुढे मीन, कूर्म, वराह, नरसिंह, वामन, भार्गव, परशुराम, दाशरथी राम, कृष्ण हे पिंग्यापासून झाले असे नाथ सांगतात. पुढे

"पिंग्यापासून बौद्ध झाला । दिले जगन्नाथ नाव त्याला ।
भक्तांनी दहीभात चारिला ।। माझा पिंगा....
ऐसा निराकाराचा पिंगा । त्यात माझा श्रीरंगा ।
एका जनार्दनी पांडुरंगा ।। माझा पिंगा घालितो धिंगा । "

येथे १२ अवतार किंवा, पिंगा सोडल्यास अकरा अवतार आहेत. या अवतार-

मालिकेत शिवाचा अंतर्भाव आहे तोही दुसरा अवतार या नात्याने जगन्नाथ म्हणजे बुद्ध. ओरिसात जगन्नाथाला, तसेच लिंगराज याला दहीभात देतात. पांडुरंगालाही दहीभात जेवू घालतात. जयदेवाच्या " जय जगदीश हरे ' या अष्टपदीत

" निन्दसि यज्ञविधे; अदह श्रुतिजातम् । सदय-हृदय-दर्शित-पशु घातम् ॥
केशव धृत-बुद्ध-शरीर । जय जगदीश हरे ॥ ९ ॥ असा उल्लेख आहे.

एकनाथांनी जयदेवाला अनुसरलेले दिसते. जगन्नाथ संप्रदाय व विठ्ठल संप्रदायामध्ये काही सार्वलौकिकता दिसते. जगन्नाथ संप्रदायात आदिवासी देव → बुद्ध → शंकर → जगन्नाथ अशी मालिका दिसते. एकनाथांचा पिंगा त्याचीच ' री ' ओढत आहे. निष्कर्ष हा की, निराकार → पिंगा ( आदिवासींचा देव ) → बुद्ध → शिव → कृष्ण/श्रीरंग पांडुरंग हे ऐतिहासिक चार अवतार, मानववंशशास्त्राच्या दृष्टीने झाले.

■ ■

## ' Pinga ' of Eknath and Dashavatara (ten incarnations)

Summary

Shri Eknath, one of the famous saint-poets of Maharashtra, cumposed two ' Bharudas ' known as ' Pinga '. From Eknath's description it seems that ' Pinga ' was an aboriginal goddess, whom the women of Eknath's period worshipped. It is important that the Bharud ' Pinga ' relates to Eknath's idea of ten incarnations ( Dashavatars ) of God. According to Eknath, in the beginning, there was formless Brahman. From this Brahman the avatars of Goddess Pinga, Buddha, Shiva, Krishna and Shri Vithal of Pandharpur were created. This theory of Eknath has similarity with poet Jayadev's theory of God's incarnations.

■ ■ ■

BISM Quarterly 63 : 1, July 1984

# Revenue assessment and agricultural price situation in the Pune region, 1818–1850

**V. D. Divekar**
Gokhale Institute of Politics and Economics, Pune.

Agricultural prices in Pune district, in western India, generally rose in the second half of the eighteenth century and started falling from about the beginning of the 19th century. It should be remembered that this general trend of rise and subsequent fall in prices in Pune area followed closely the pattern of political change, namely, the growth of the native Maratha power in the 18th century and its subsequent fall and commencement of the alien British rule at the beginning of the 19th century. Pune held a dominant position in social, political and economic life in western India as the capital city of the Maratha confederacy upto 1818, after which it was reduced to a district place in the Bombay Presidency under the British rule.

The rise in agricultural prices under the Marathas was accompanied by increasing tillage, high rates of assessment and a large number of various avenues of non-agricultural employment open to the local populace. The fall in agricultural prices on the other hand was accompanied by conditions of widespread economic depression and unemployment and changing rates of assessment.

It may be mentioned here that a similar price trend was noticeable during this period in other districts of western India also, and in most of the other parts of the Indian subcontinent as well. Low prices are known to have prevailed also in Europe in the first half of the 19th century. It was

from about the middle of the nineteenth century that prices started rising again everywhere. Although similar price movements prevailed during this period at different and mutually distant places, they were not, it appears, generated by the same or similar causes.

The British revenue officers of the early nineteenth century in their official correspondence and reports made frequent references to the price situation while fixing the rates of assessment and collection. They also collected and recorded a variety of economic information relating to different villages. The present paper confines its discussion mostly to the data collected and views expressed by the British revenue officers of the day.

**Price data**

